# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

माहितीचा अधिकार

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २५६४/२०२४**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मनिष रामभाउ उदापुरकर, प्लाट नं. २८०, श्री महालक्ष्मी नगर, न्यु नरसाला रोड, प्रभा स्मृती अपार्टमेंट, नागपूर-३४ | शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर | शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १५.०६.२०२६**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०२.१०.२०२४
(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३.१०.२०२४
(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अप्राप्त
(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जोडपत्र-अ नुसार माहिती देण्यात यावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २३.०६.२०२४
(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २३.०६.२०२४
(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : अर्ज दिलेल्या तारखेच्या १ महिन्याचा आत
(४)जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : " श्री. रामभाउ नथ्थुजी उदापुरकर, से. नि. मुख्याध्यापक, यांचे से.नि. प्रकरण शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयात दिनांक ०८.०५.२०२४ या तारखेला सादर करण्यात आले होते. त्याबाबत आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती पुरविण्यात यावी (महालेखाकार कार्यालयात सादर केले असल्यास जावक क्र.)" असे नमूद करुन माहिती मागितलेली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २९.०७.२०२४
(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २९.०७.२०२४
(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे
(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २९.०७.२०२४ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतल्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

५. **युक्तीवाद/लेखी खुलासा** – आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलकर्ता उपस्थित असून त्यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार विहित मुदतीत कोणतीही माहिती पुरविलेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपील अर्जावर अद्यापपर्यंत सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही.

**६. निष्कर्ष :–**

१. अपिलार्थी, श्री. मनिष रामभाउ उदापुरकर यांनी दिनांक २३.०६.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. ही बाब माहिती अधिकार अधिनिमातील तरतूदींचा उल्लंघन व थट्टा करणारी आहे, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे.
२. माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजेच ३० दिवसात अपीलार्थीस /पत्रव्यवहार करणे/ शुल्क कळविणे /निरिक्षण देणे/कार्यवाही प्रलंबित असल्यास तसे पत्रान्वये कळविणे याबाबी अपेक्षित आहे. तथापि, अपिलकर्ता यांच्या माहिती अर्जानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) चा भंग होत असल्याने त्यांच्याकडून खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरत आहे.
३. तसेच अपिलकर्ता यांनी दाखल केलेला प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे प्राप्त झाला असून देखील त्यांनी अपिलकर्ता यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी

घेतल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम १९(६) नुसार प्रथम अपील अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेवून अपील निकालात काढणे आवश्यक आहे. परंतू प्रथम अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी घेतलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग होत असल्याने त्यांच्याकडून खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरत आहे.

४. आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा आयोगास कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित आहेत. प्राधिकरणाच्या अनुपस्थितीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर संबंधित तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे इतर संबंधित अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता व्दितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल," असे नमूद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून त्यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासा मागविणे आवश्यक ठरते.

५. अपिलकर्ता, श्री. मनिष उदापुरकर यांना जोडपत्र-अ नुसार मागितलेली माहिती अद्यापपर्यंत प्राप्त न झाल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थी यांच्या मूळ माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखावर उपलब्ध असल्याप्रमाणे माहिती पुरविणे क्रमप्राप्त ठरत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**अंतरिम आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २३.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोहच देय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग(माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत

धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३. प्रथम अपिलीय अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रथम अपील अर्ज ४५ दिवसात सुनावणी घेवून निकाली काढणे अपेक्षित होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.के.मा.अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१.०३.२००८ व दि.१०.०६.२००८ च्या परिपत्रकानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये, याचा खुलासा संबंधित तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

४. आज रोजी सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी आयोगाचा बहुमूल्य वेळ वाया घालविला आहे. **महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासकीय परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र-(२२२/२०१५) सहा. मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ०१.१२.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार** आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर सर्व सार्वजनिक प्राधिकरणास उपस्थिती बंधनकारक राहील असे सुचित करण्यात आलेले आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबतची नोंद घेवून त्यांच्या अनुपस्थितीचा अहवाल सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत आयोगात व्यक्तीशः हजर राहून सादर करावा.

५. वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

3 JUL 2026

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १५.०६.२०२६**

जावक क्रमांक ५७३२ दिनांक